# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १४/०९/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

### विश्वासघात

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १५ कि मी अंतरावरील हायवे ५३ बस टॉप जवळ कोकनागड भंडारा येथे ११/०९/२२ चे ०१.०० वा. फिर्यादी नामे— अजय ओमदेव उके वय ३० वर्ष, रा.महादुला ता. मौदा जि. नागपुर याची कल्पना राईस मिल जवळ चाय ची टपरी असुन त्याचे टपरीवर मागील तीन महिण्यापासुन एक अज्ञात आरोपी हा चाय पिण्यास येत असुन त्याचे सोबत फिर्यादीची तोंड ओळख होती. त्यामुळे आरोपीने फिर्यादीला आपल्या सोबत खाजगी काम आहे म्हणुन भंडारा येथे घेवुन गेला व भंडारा वरून एका धाब्यावर दारू पिवुन फिर्यादीला 'तु येथे थांब' असे सांगुन त्याची एम.एच— ४०/सी.के— ६०१८ क्रमांकाची एक्टीवा मोपेड किमती ५०,०००/—रू. हे विश्वास घात करून घेवुन गेला. ती आज पर्यंत परत न आणुन दिल्याने फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचे घटनास्थळ हे करंधा पो.स्टे हद्दीतील जि. भंडारा येथील असल्याने सदर गुन्हा हा वर्ग करण्यात आले आहे.

### फसवणुक

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा राजाजी वार्ड रामटेक येथे दिनांक ०९/०९/२०२२ चे २०.०० वा. ते दिनांक ११/०९/२०२२ चे १६.०० वा. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे मोबाईलवर फोन करून 'मी एस.बी.आय.बॅकेतुन कस्टमर केअर बोलतो' व फिर्यादीचे क्रेडीट कार्डचे ड्यु भरण्यास सांगुण एक anydesk अप्लीकेशन डॉउनलोड करण्यास सांगुन फिर्यादीचे क्रेडीट कार्ड तसेच युनियन बॅकेची माहीती प्राप्त करून कम्युनिकेशन साधनाचे सहाय्याने ऑनलाईन टप्याटप्याने १४,९३५८/—रू. ची धोकाधाडी करून फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— माया दिनेश वानखेडे वय ३८ वर्षे रा. राजाजी वार्ड रामटेक यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक योगेश भुरे मो.न. ७७२२००३६७३ हे करीत आहे.

### गांजा बाळगणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. कुही**:— अंतर्गत वडोदा रोड कुही वॉर्ड क्र. १३ कुही ता. कुही जि. नागपुर येथे दिनांक १४/०९/२०२२ चे ०४.०० वा. ते ०४.३० वा. दरम्यान आरोपी नामे— इशाक खैरात अली सयद, वय ४८ वर्ष, रा. बाजार चौक, कुही ता. कुही जि. नागपुर हा वडोदा रोड कुही येथे त्याच्या उजव्या हातात असलेल्या एका पांढऱ्या राखडी प्लास्टीक पिशवीमध्ये हीरवट रंगाचे वाढलेले पानाचा पाचोडा असल्या सारखा व गद व उग्र वास असलेला गांजा ३३० ग्रॅम कि. १६,५००/—रू. चा मुददेमाल नेतांना मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातुन असा एकुण १६,५००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस शिपाई समाधान पवार पो.स्टे कुही यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम २० एनडीपीएस अॅक्ट कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री देविदास ठमके मो.नं. ८७८८५५३१३९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**